Tender No. Uni Press/ AB28P8 /1112/ 3

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

## उत्तरपत्रिका तयार करण्याकरीता निविदेच्या नियम व अटी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हिवाळी २०११ व उन्हाळी २०१२ च्या परीक्षेसाठी उत्तरपत्रिका तयार करण्याकरीता निविदा आमंत्रित करण्यात येत आहे. त्याचे विवरण खालील प्रमाणे :—

(१) २८ पानी लेखी उत्तरपत्रिका (मुखपृष्ठासह) : ४५,००,००० प्रती

(२) ८ पानी प्रात्यक्षिक उत्तरपत्रिका : ११,००,००० प्रती

(३) उत्तरपत्रिकेचा आकार १/४ डेमी राहील. नविन उत्तरपत्रिकेकरीता लागणारा कागद डबल डेमी ५७ सेंमी X ८९ सेंमी आकाराचा किंवा ८९ सेंमी रूंदीची रिळ असेल हा कागद विद्यापीठ मुद्रणालयातून स्वखर्चाने घेऊन जावा लागेल. कागदासाठी राष्ट्रीयकृत बॅंकेची रूपये ५ लाखाची हमी द्यावी लागेल.

(४) उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठासह टेलर शिलाई करावयाची आहे.

(५) पंचिग :— (अ) उत्तरपत्रिकेच्या वरच्या भागाला डाव्या कोपऱ्यात (कॉर्नर) एक होल पंचिंग करावयाचे आहे.

(ब) विशेष RTMNU पंच विशिष्ट जागी करावयाचे आहे. RTMNU पंचिंग मशिन मुद्रणालयाकडून पुरविण्यात येईल.

(६) क्रमांकन :— (अ) प्रत्येक प्रकारच्या उत्तरपत्रिकेवरील प्रत्येक पानावर अनुक्रमाने क्रमांक व विद्यापीठाच्या मुद्रेसह रेखांकित ऑफसेट छपाई करावयाची आहे.

(ब) प्रत्येक प्रकारच्या उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावर अनुक्रमाने क्रमाकंन (मशीन नबरींग) करावयाची आहे.

(७) कटसाईज :— प्रत्येक उत्तरपत्रिकेच्या कटिंग नंतर ८.५" X ११.००" आकार असणे आवश्यक आहे. नमुद आकारापेक्षा कमी आकाराच्या उत्तरपत्रिका स्विकारण्यात येणार नाहीत.

(८) वर्तावळा (वेस्टेज) :— छपाई व बांधणीच्या संपूर्ण प्रक्रियेवर १% टक्का कागद वर्तावळा (वेस्टेज) देण्यात येईल.

(९) प्रत्येक अनुक्रमांने ५० लेखी उत्तरपत्रिकेचे एक श्रिंक पाकिट (प्लास्टिकमध्ये) याप्रमाणे एक बंडल तयार करवून २५० (उत्तरपत्रिकेचे) प्रतीचे खाली व वर खर्डा (Straw Board) ठेवून बारदाना पॅकिंग मध्ये पार्सल तयार झाल्यावर मेटल प्लास्टिक क्लिप पॅकिंगने

बंडल चारही बाजुने बांधवयाचे आहे. तसेच प्रत्येकी १०० प्रात्यक्षिक उत्तरपत्रिकेचे एक श्रिंक पाकिट (प्लास्टिकमध्ये) याप्रमाणे १०००प्रतीचे एक बंडल तयार करवून खाली व वर खर्डा (Straw Board) ठेवून बारदाना पॅकिंग मध्ये पार्सल तयार करावयाचे आहे.

(१०) उत्तरपत्रिका तयार करून पोहचविण्याचे ठिकाण परीक्षा भवन, एल.आय.टी. परिसर, अमरावती रोड, नागपूर.

(११) मोहोरबंद निविदेसोबत अनामत रक्कम रू. ५०,०००/– चा राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्राफ्ट कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांचे नावाने जोडणे आवश्यक आहे. अनामत रक्कमच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची सूट दिली जाणार नाही. डिमांड ड्राफ्ट नसलेल्या निविदा ग्राहय धरल्या जाणार नाही.

(१२) कामाचा अवधी :– ३१ डिसेंबर, २०११ पर्यंत २८ पानी ४५,००,००० उत्तरपत्रिकपैकी ५ लाख उत्तरपत्रिका १५ ऑगस्ट ११ पूर्वी तयार करावयाच्या आहेत. नमूद केलेल्या मुदतीत काम पूर्ण करण्याची हमी द्यावी लागेल. काम पूर्ण करण्यास कोणतीही मुदतवाढ मिळणार नाही. जर मुदतीच्या आत काम पूर्ण न केल्यास जेवढया उत्तरपत्रिका तयार करावयाच्या शिल्लक राहतील तेवढया उत्तरपत्रिकांवर एकूण ५० टक्के रकक्म दंडात्मक कारवाई म्हणून देयकातून कमी करण्यात येईल.

(१३) दर–प्रती हजार प्रत्येक उत्तरपत्रिकेचा नमुद करावा. (सर्व करांसहित)

(१४) देयकाच्या संपूर्ण रकमेवर टी. डी. एस. कपात करण्यात येईल.

(१५) निविदेतील दर चालू आर्थिक वर्षासाठी वैध राहतील.

(१६) **ही निविदा द्वि–लिफाफा (Two Bid Systems) पद्धतीने भरावयाची आहे.** 'अ' हा तांत्रिक निविदा लिफाफा (Technical Bid: Form "A") असणार आहे. या लिफाफ्यासोबत पूढील दस्तऐवज जोडणे आवश्यक आहे.– (१) अनामत रक्कम रू. ५०,०००/– चा राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्राफ्ट (२) विक्रीकर नोंदणी प्रमाणपत्र (३) चालू आयकर प्रमाणपत्र, (४) उत्तरपत्रिका कामाचे अनुभव प्रमाणपत्र, (५) आर्थिक स्थितीचे प्रमाणपत्र, (६) विमा प्रमाणपत्र, (७) निविदा धारकांची स्वमालकीची कमीत कमी २००० चौरस फुटाचे पक्क्या स्वरूपाची गोदामाची जागा असणे बंधनकारक आहे. पाहणीत तसे न आढळल्यास आदेश रद्द करण्यात येईल, (८) निविदा धारकांच्या प्रतिष्ठानाच्या स्वमालकीचे २३'' X ३६'' आकारातील कमीत कमी दोन शीटफेड ऑफसेट किंवा वेब ऑफसेट प्रिंटींग मशीन्स असणे आवश्यक आहे. तसेच बांधणीसाठी आवश्यक यंत्रे व उपकरणे असावीत आणि त्याबाबतचे प्रमाणित दस्तऐवज सोबत जोडावे. (९) ग्राहकांची यादी

(१७) निविदाधारकाची निविदा नमुद दस्तऐवजा अभावी रद्द समजण्यात येईल. जे निविदाधारक 'अ' हया तांत्रिक निविदा लिफाफा (Technical Bid : Form "A) पद्धतीत पात्र ठरतील त्याच प्रतिष्ठांनाचा 'ब' हा किंमत निविदा लिफाफा उघडण्यात येईल.

(१८) 'ब' हा किंमत निविदा लिफाफा (Commercial Bid : Form "B" ) असणार आहे. हयात फक्त दर नमूद करावयाचे आहे.

(१९) कोऱ्या निविदा व्यवस्थापक रा.तु.म.ना.वि.मुद्रणालय, नागपूर यांचे कार्यालयीन वेळेत येथे दिनांक **१ जून, २०११ पासुन १४ जून, २०११ ला दुपारी १२.३०** पर्यंत मिळू शकेल. कोऱ्या निविदेचे (ना–परतावा) विक्री मुल्य रु. ५००/– आहे. याकरिता राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्राफ्ट कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचे नावाने आणणे आवश्यक आहे.

(२०) निविदेचे सादरीकरण : 'अ' व 'ब' हे दोन लिफाफे तिसऱ्या लिफाफ्यात टाकून व्यवस्थापक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ मुद्रणालय, आर. टी. रोड, सिव्हील लाईन, नागपूर यांचे कार्यालयात दिनांक **१५/६/२०११ रोजी दुपारी २.३०** वाजेपर्यंत पोहोचेल या बेताने पाठविण्यात यावे. वरील निर्धारित तारखेस व वेळेनंतर आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत. प्राप्त निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी दिनांक ४.३० वाजता खालील स्वाक्षरी करणाऱ्याचे कार्यालयात उघडण्यात येतील.

(२१) कामाचा आदेश मिळाल्यानंतर सात दिवसाचे आत कामाच्या रकमेच्या १० टक्के अथवा अनामत रक्कम रू. ५०,०००/– यापैकी जी जास्त असेल ती रक्कम सुरक्षा ठेव म्हणून विद्यापीठाकडे जमा करणे आवश्यक राहील व सोबतच रू. ५ लाखांची बॅक गॅरंटी द्यावी लागेल.

एक वा संपूर्ण निविदा कोणत्याही कारण न देता अस्विकृत करण्याचा अधिकार विद्यापीठाचा राहील. यांची कृपया नोंद घ्यावी.

कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ